# दृष्टीबाधीत विद्यार्थ्यांना अत्याधुनिक स्मार्ट फोन वितरण सोहळा संपन्न

**नाशिक ।** नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड महाराष्ट्र आणि व्हाईस ऑफ स्पेशल एबल्ड पिपल संस्था अमेरिका यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील ७४ दृष्टीबाधीत शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांना सॅमसंग गॅलक्सी फाईव्ह जी स्मार्टफोनचे वाटप करण्यात आले. ज्यात विशेषत्वाने स्क्रीन रीडर, वाईस नेव्हीगेशन टूल्स आणि कीबो ॲप्स उपलब्ध करून जे प्रिंट आणि डिजिटल सामुग्री शिक्षणासाठी सुलभ होतात. असे उपकरण श्रीमती हेलन केलर यांच्या जयंतीचे औचित्य साधून नॅब महाराष्ट्राच्या सभागृहात वितरण सोहळा संस्थेचे रामेश्वर कलंत्री यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख अतिथी म्हणून ख्यातनाम सी. ए. व व्होसॅपचे महाराष्ट्राचे संचालक विनोद जाजू, यशस्वी उद्योजक हेमंत बक्षी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. व्यासपीठावर विनोद जाजू, हेमंत बक्षी, रामेश्वर कलंत्री, मानद महासचिव गोपी मयूर व्होसॅप प्रतिनिधी ध्रुव चावडा व यामिनी पारसानिया (अहमदाबाद), सूर्यभान साळुंखे, डॉ. मुक्तेश्वर मुणशेट्टीवार होते.

प्रारंभी दीप प्रज्वलन करून व हेलन केलर व लुई ब्रेल यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर महानॅब स्कूलच्या विद्यार्थिनींनी पाहुण्यांचे व राज्यातून आलेल्या सर्व विद्यार्थी, पालक, निमंत्रित यांचे स्वागत केले. रामेश्वर कलंत्री यांनी नॅब महाराष्ट्र करीत असलेल्या कार्याचा आढावा व भविष्यातील करावयाच्या कार्याचा धावता आढावा घेऊन या स्मार्ट फोन वितरण कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले. पाहुण्यांचा सत्कार रामेश्वर कलंत्री, गोपी मयूर, सूर्यभान साळुंखे, डॉ. मुक्तेश्वर मुणशेट्टीवार, प्रा. डॉ. सिंधू काकडे आदींनी केला. प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक हेमंत बक्षी यांनी आपल्या मनोगतात नॅब महाराष्ट्राचे कार्य विशेष उल्लेखनीय असून मनाला भावणारे आहे. ज्यांना दृष्टी नाही त्यांना प्रकाशात आणण्याचे जटील काम ही संस्था लोकसहभागातून करीत असल्याने मला नॅब महाराष्ट्राचे दर्शन पंढरपूरच्या विठ्ठल रखुमाई इतकेच महत्त्वाचे झाले. योगायोगाने आषाढ महिना असंख्य वारकरी दिंडीच्या माध्यमातून पंढरपूरला जातात त्याप्रमाणे नॅबचे वारकरी ही दृष्टी नसताना त्यांना सृष्टी दाखवून सक्षम करण्यासाठी अतिशय परिश्रम घेत असतात ही बाब स्पृहनिय आहे. माझ्या वतीने या पवित्र कार्यासाठी शक्य ते सहकार्य करेन असे मनोगतात सांगितले.



### कविता ऐकवली तेव्हा सभागृह भारवून गेले

या कार्यक्रमात ऑनलाईन पद्धतीने व्होसॅप संस्थेचे संस्थापक संचालक व शिल्पकार प्रणव देसाई अमेरिकेतून ऑनलाईन उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे संवाद साधला. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना पुढे म्हणाले की, व्होसॅप विजन ड्राईव्ह 2025 पासूनचा महत्वाकांक्षी यात्रेचा प्रारंभ नाशिक सारख्या तीर्थक्षेत्री होतो याचा आनंद व्यक्त करून भारत देशाच्या शताब्दी वर्षापर्यंत एक समावेशी विकसित आणि न्याय संगत राष्ट्र व्हावे, त्यात दिव्यांगांनी सुद्धा मागे न राहता डिजिटल सशक्तिकरणामध्ये सिद्ध होवून समाजाला स्वतःहून आर्थिक सहभाग देवू शकेल इतकेच समर्थवान करावयाचे आहे व दिव्यांग ते करतील असा विश्वास त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. ॲड. भारती यादव नागपुर या अंध मुलीचा एक काव्यसंग्रह प्रकाशित झाला त्यातील "आई व दिव्यांग पाल्य" ही कविता श्रोत्यांना ऐकवली तेव्हा संपूर्ण सभागृह भारवून गेले होते. ती सध्या नागपूरच्या उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून स्वतंत्रपणे कार्य करीत आहे. पाहुण्यांचा परिचय गोपी मयूर व स्मिता सिंधीकर यांनी तर आभार सुजला कमलापूरकर, तर सूत्रसंचालन जयवीर विरमानी यांनी केले. कार्यक्रम लाईव्ह असल्याने तांत्रिक बाजू वाल्मीक पाटील, रेणुका सोनवणे, रत्नाकर गायकवाड, अशोक बागल या टीमने सांभाळली. या कार्यक्रमासाठी राज्यातून विद्यार्थी त्यांचे पालक, निमंत्रित, संस्थेचे पदाधिकारी जयप्रकाश जातेगावकर, रघुवीर अधिकारी, गुणवंत मणियार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# नवीन उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीची युवा सेनेकडून पाहणी



**मनमाड । जलकुंभाची पाहणी करतांना युवा सेनेचे जिल्हाप्रमुख फरहान खान, सुनील हांडगे, साईनाथ गिडगे, मयुर बोरसे आदी.**

**मनमाड ।** मनमाड शहराच्या जलसमस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून आमदार सुहास कांदे यांच्या पुढाकारातून आणि विशेष प्रयत्नातून सुरू झालेल्या करंजवण-मनमाड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये पाणी टाक्या उभारल्या जात आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ५ मधील माधवनगर येथे उभारण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीची पाहणी युवासेना जिल्हाप्रमुख फरहान खान यांनी केली.

यावेळी त्यांनी संबंधित ठेकेदारांशी थेट चर्चा करत कामांच्या गतीबाबत विचारणा केली व उर्वरित काम तातडीने आणि गुणवत्तेसह पूर्ण करण्याचे निर्देश दिले. पाण्याच्या टंचाईने त्रस्त असलेल्या मनमाडकरांसाठी ही योजना जीवनदायी ठरणार असल्याने कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

या योजनेच्या माध्यमातून मनमाड शहराच्या जलपुरवठ्यात लक्षणीय सुधारणा होणार असून, भविष्यातील पाणीटंचाईची भीतीही दूर होणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. या पाहणी दौऱ्यात शिवसेना शहरप्रमुख मयूर बोरसे, उपजिल्हाप्रमुख सुनील हांडगे, तालुकाप्रमुख साईनाथ गिडगे, युवासेना शहराधिकारी योगेश इमले, तसेच लाला नागरे, दिनेश घुगे, निलेश ताठे, धनंजय आंधळे, तुषार वानखेडे, सचिन दरगुडे, निलेश व्यवहारे हे पदाधिकारी उपस्थित होते.

# रेल्वेच्या धडकेत राष्ट्रीय पक्षी मोराचा मृत्यू...



**मनमाड ।** आज सकाळच्या सुमारास मनमाड येथील नगर चौकीजवळील रेल्वे गेट क्रमांक ८२ येथे एक दुर्दैवी घटना घडली. हुबळीवरून येणाऱ्या मुजफ्फरनगर एक्सप्रेस गाडीच्या धडकेने भारताच्या राष्ट्रीय पक्षी असलेल्या मोराचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेच्या वेळी रेल्वे फाटक बंद होते आणि अनेक वाहनचालक व स्थानिक नागरिक रस्त्यावर थांबले होते. याच दरम्यान, जवळपास अर्धा किलोमीटर अंतरावरून उडत आलेल्या मोराला धावत्या गाडीने जोरदार धडक दिली. काही क्षणांसाठी गाडी गेटजवळ स्लो झाल्याने नागरिकांनी मोर धडकून वरती लटकताना पाहिला. थोड्याच वेळात तो खाली कोसळला. घटनेचे साक्षीदार असलेले शिवसेना उपशहरप्रमुख संजय दराडे, रमेश काकड, बापू भाऊ दराडे, रमेश जाधव, संजय भाऊ राऊत व इतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मोराला रुळावरून सुरक्षित बाजूस हलवले. त्यावेळी मोर गंभीर जखमी अवस्थेत होता. नागरिकांनी त्याला पाणी पाजण्याचा प्रयत्न केला, मात्र काही प्रतिसाद न मिळाल्यामुळे काही क्षणांतच त्याचा मृत्यू झाला. यासंदर्भात वनविभागास माहिती देण्यात आली असून वनरक्षक सोनाली वाघ आणि वनकर्मचारी अंकुश गुंजाळ यांनी घटनास्थळी हजर राहून मृत मोराची पाहणी केली. पुढील वैद्यकीय तपासणी आणि कायदेशीर कार्यवाहीसाठी मोराचा मृतदेह वनविभागाच्या ताब्यात देण्यात आला. मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी असून त्याचे संरक्षण करणे आपली नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने अधिक दक्षता घेण्याची गरज असल्याचे नागरिकांनी सांगितले.

# शिवाजी हांडोरे यांचा वाढदिवस विधायक उपक्रमाने साजरा

**नाशिकरोड ।** येथील शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे माजी अध्यक्ष आणि विहितगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन शिवाजी हांडोरे यांचा वाढदिवस गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्रदान करत विधायक उपक्रमाने साजरा करण्यात आला.



पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील आदर्श प्राथमिक विद्यामंदिरच्या गरजू विद्यार्थ्यांना स्कूलबॅग आणि वह्यांचे वाटप हांडोरे यांच्या वाढदिवसानिमित्त 'महाराष्ट्र माझा' परिवाराच्या वतीने करण्यात आले. महाराष्ट्र माझा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विकास (बंटी) भागवत, पळसे येथील ग्रामाभिमान मंचचे अध्यक्ष प्रमोद गायधनी, शिवजन्मोत्सव समितीचे माजी कार्याध्यक्ष मनोज ठाकरे, माजी सरचिटणीस संदीप वाळके, विहितगावच्या प्रतिपंढरपूर देवस्थानचे दिनेश हांडोरे, अमर जमधडे, ओम हांडोरे, ओम शिंदे, प्रणव गुरुळे, मुख्याध्यापक चंद्रकांत खाणकरी, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण पगार, शिक्षक कैलास लहांगे मंचावर उपस्थित होते.

शिवाजी हांडोरे यांचा वाढदिवस फळांचा केक कापून अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. पाहुण्यांनी भाषणात या विधायक उपक्रमाचे स्वागत करून गरजूंच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी समाजातील दानशुरांनी मदत करण्याचे आवाहन केले. मुख्याध्यापक चंद्रकांत खाणकरी यांच्यासह शिक्षिका शांता सानप, योगिता पाटोळे, शोभा काळे, माणिक भरसट, जयश्री आगळे, वर्षा सानप यांनी स्वागत केले. रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

# खेळाडूंनी मेहनत घेऊन ऑलिम्पिकपर्यंत मजल मारावी : अजित दान

### पारितोषिक वितरणाने जागतिक ऑलिम्पिक सप्ताहाची सांगता

**नाशिक ।** नाशिक जिल्हा ऑल गेम्स असोसिएशन, कालिका देवी मंदिर ट्रस्ट आणि यशवंत व्यायाम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक ऑलिम्पिक दिन आणि ऑलिम्पिक सप्ताहाची काल यशस्वी सांगता झाली.

दि. २३ ते ३० जूनपर्यंत क्रीडा सप्ताह अंतर्गत आयोजित विविध स्पर्धांचा एकत्रित पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या क्रीडा प्रकारांमध्ये तलवारबाजी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेबल टेनिस, फुटबॉल, गोल्फ, कॅरम, टेनिस व्हॉलीबॉल या खेळांचा समावेश होता. या सर्व स्पर्धांमध्ये पहिले तीन क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंना आकर्षक मेडल्स आणि प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सीमा शुल्क आणि जी. एस. टी. चे ॲडिशनल कमिशनर



अजित दान, सिग्नेचर इंटरनॅशनल फूड लिमिटेडचे संचालक यतीन पटेल, पार्वती इंटरनॅशनल लिमिटेडचे संचालक विकास सिंग, कालिका मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष केशव पाटील, ऑल गेम्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल देहसमुख, उपाध्यक्ष चंद्रशेखर सिंग, खजिनदार हेमंत पांडे, उपाध्यक्ष संदीप सोनावणे, नाशिक जिल्हा मराठा महासंघाचे युवा अध्यक्ष व्यंकटेश मोरे, छत्रपती पुरस्कार प्राप्त अशोक दुधारे, या क्रीडा सप्ताहाचे आयोजन प्रमुख आनंद खरे यांच्या हस्ते विविध खेळांच्या विजेत्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. याचप्रमाणे हा ऑलिम्पिक सप्ताह यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे सर्व खेळांचे आयोजक राजू शिंदे, शशांक वझे, किरण घोलप, गायत्री भिंगे, अमर भिगे, अभिषेक सोनावणे, भूषण भटाटे, नकुल चावरे, गणेश कलूगल, रिझवान शेख आणि त्यांचे सर्व सहकारी यांना ट्रॅक सूट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलतांना अजित दान यांनी सांगितले की प्रत्येकाच्या आयुष्यात खेळाला फार महत्व आहे. आजच्या तरुण खेळाडूंनी अश्या उपक्रमाच्या माध्यमातून मेहनत करून आपल्या राज्याचे आणि देशाचे नांव आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि थेट ऑलीम्पिकमध्ये गाजवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी राहुल देशमुख, चंद्रशेखर सिंग, हेमंत पांडे, केशव पाटील यांनीही खेळाडूंना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक अशोक दुधारे यांनी तर आभार प्रदर्शन आनंद खरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद चकोर आणि अविनाश वाघ यांनी केले. हा ऑलिम्पिक सप्ताह यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे सर्व खेळांचे संघटक राजू शिंदे, शशांक वझे, किरण घोलप, गायत्री भिंगे, अमर भिगे, अभिषेक सोनावणे, भूषण भटाटे, नकुल चावरे, गणेश कलूगल, रिझवान शेख, चिन्मय देशपांडे, आणि त्यांचे सर्व सहकारी यांना ट्रॅक सूट प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पुढील वर्षी या सप्ताहामध्ये आणखी खेळांचा समावेश केला जाईल आणि आणखी मोठ्या प्रमाणात या सप्ताहाचे आयोजन केले जाईल, अशी ग्वाही ऑल गेम्स असोसिएशनचे पदाधिकारी यांनी दिली.

### महत्त्वाचे

## साईराज परदेशीची भारतीय संघात निवड

**मनमाड ।** अस्थाना कजाकिस्तान येथे होणाऱ्या आशियाई जुनिअर वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय खेळाडू साईराज परदेशी याची भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. ४ जुलै ते १० जुलै दरम्यान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून मनमाडचा आंतरराष्ट्रीय खेळाडू साईराज परदेशी आपल्या सलग पाचव्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे. साईराज ८८ किलो वजनी गटात भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करत असून अशी जूनियर स्पर्धेमध्ये त्याला पदक प्राप्त होण्याची शक्यता आहे.साईराज परदेशीला वेटलिफ्टिंग प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तृप्ती पाराशर भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे आलोकेश बरवा, डी. डी. शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले आहे. जय भवानी व्यायामशाळेचे अध्यक्ष डॉ. विजय पाटील, मोहन गायकवाड, डॉ.सुनील बागरेचा, प्रा.दत्ता शिंपी, छत्रे विद्यालयाचे अध्यक्ष पी.जे.दिंडोरकर, सचिव दिनेश धारवाडकर,संचालक नाना कुलकर्णी, बी. एस. कुलकर्णी, प्रसाद पंचवाघ, मुख्याध्यापिका एस.एस.पोतदार, उपमुख्याध्यापक संदीप देशपांडे, पर्यवेक्षिका व्ही.व्ही. चांदवडकर, महाराष्ट्र वेटलिफ्टिंग संघटनेचे सचिव संतोष सिंहासने, अध्यक्ष सुधीर म्हाळसकर यांनी साईराजचे अभिनंदन केले व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# शेतकरी संघटनांनी धुडकावली जिल्हा बॅंकेची एक रक्कमी परतफेड योजना

**पिंपळगाव बसवंत ।** नाशिक जिल्हा मध्यवर्ती बॅंकेची 2025 /26 या वर्षासाठी लागू होणारी एक रकमी कर्ज परतफेड योजना (ओटीएस) योजना थकबाकीदार शेतकऱ्यांना मान्य नाही! त्या ऐवजी संपूर्ण व्याज माफ करून मुद्दलाचे दहा हप्ते करून द्यावे तसेच येणाऱ्या काळात होणाऱ्या कर्जमाफीचा शेतकऱ्यांना लाभ मिळावा कर्जमाफी झाल्यास ते पैसे शेतकऱ्यांच्या कर्जखाती किंवा त्यांच्या सेविंग खाती देण्यात यावे असा ठराव सर्वसाधारण सभेत बैठकीत ठराव करून घ्यावा व शासनास पाठवावा अशी एक मुखी मागणी पिंपळगाव बसवंत विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सभागृहात झालेल्या सर्व शेतकरी संघटनांच्या बैठकीत करण्यात आला.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी 938 आदिवासी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे होते ! शेतकरी संघटनेचे पदाधिकारी या बैठकीस प्रमुख शेतकरी प्रतिनिधी म्हणून हजर होते त्यात शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे, शेतकरी नेते प्रकाश शिंदे दिंडोरी, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन बोराडे, शेतकरी नेते बिंदू शेठ शर्मा, सुरेश पवार, खेमराज कोर, दिलीप पाटील, रामराव



मोरे, मोती नाना, रमेश बोरस्ते बाळासाहेब बोरस्ते दगाजी अहीरे सुधाकर बोरस्ते नवनाथ बोरस्ते, सोमनाथ सहाने, प्रकाश वाघ, सोमनाथ मोकाटे, शिवलाल परदेशी, मोत् दत्तात्रय सुडके, सुभाष पाटील, बाजीराव भगरे, ज्ञानेश्वर घेतले, बाळासाहेब हिरे, अंबादास खुडे, भाऊसाहेब भंडारे, अशोक भंडारे, एकनाथ धनवटे, पंडित ठाकरे, भगवन दातारे, रंगनाथ पाटील, अशोक भंडारे यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी प्रतिनिधी या बैठकीत उपस्थित होत याबाबत सविस्तर वृत्त असे की, चार जुलै रोजी नाशिक येथे कालिदास कला मंदिर सभागृहात नाशिक जिल्हा मध्यवर्ती बॅंकेच्या नवीन योजना 2025, /26 साठी लागू करण्यासाठी राज्य शासनाने २३ एप्रिल रोजी मुंबई येथे अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त बॅंकेस पाठवून सर्वसाधारण सभा घेऊन त्या योजनेस सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घ्यावी व त्यानंतर ही योजना लागू करावी या योजने संदर्भात थकबाकीदार शेतकऱ्यांचे मते जाणून घ्यावे असे आदेश दिले आहेत त्या आदेशानुसार या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे या सर्वसाधारण सभेच्या आधी आज एक जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटनेचे पदाधिकारी बैठकीसाठी बोलविण्यात आले होते या बैठकीत एक मताने ठराव मांडण्यासाठी आज बैठक आयोजित करण्यात आली होती व या बैठकीत जिल्हा बॅंकेने काढलेले परिपत्रकाचे वाचन करण्यात आले व या परिपत्रकानुसार शेतकऱ्यांचे मते जाणून घेण्यात आली सर्व शेतकरी नेते व थकबाकीर शेतकऱ्यांनी ओटीएस योजना लागू करावी मात्र शेतकऱ्यांचे मुद्दलावरील संपूर्ण व्याज शासनाने भरावे. तसेच आमची कर्जमाफीची मागणी कायम असून शासनाने कर्जमाफी केल्यास जे शेतकरी कर्जाचे पैसे भरतील यांचे पैसे राज्य शासनाने आणि बॅंकेने शेतकऱ्यांच्या कर्ज खाती किंवा शेतकऱ्यांच्या सेविंग खाती जमा करावेत अशी मागणी या बैठकीत करण्यात आली ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त केलेल्या आहेत त्या शेतकऱ्यांची नावे पुन्हा लावण्यात यावीत आणि यापुढे शेतकऱ्यांवरील सक्तीची कारवाई तत्काळ थांबवण्यात यावी असे मागणे बैठकीत करण्यात आली.

शासनाने तसे आदेश बॅंकेला द्यावे मयत सभासदां नाही व्याज माफ करून कर्ज भरण्यासाठी त्यांच्या वारसांना मुद्दलाचे 10 हप्ते करून द्यावेत शेतकऱ्यांना आपली मते मांडण्यासाठी या बैठकीस उपस्थित राहू द्यावे ज्या शेतकऱ्यांचे खाते शील केले असतील ते खाते तत्काळ ओपन करावे इतर मागण्या संदर्भात चर्चा करून या संदर्भात बॅंकेत तात्काळ पत्र घेण्यात यावे असे या बैठकीत ठरविण्यात आले या बैठकीमध्ये बिंदूशेठ शर्मा, प्रकाश शेठ शिंदे, अर्जुन बोराडे, भगवान बोराडे, दिलीप पाटील, रामराव मोरे, खेमराज कोर, बाळासाहेब बोरस्ते, रमेश बोरस्ते यांचे भाषणे झाली.



# 'अभियंता पती, ठेकेदार पत्नी भ्रष्टाचाराची नवीनच युक्ती!'

## सिंचन विभागातील अभियंत्याचा गैरप्रकार उघड



**नाशिक ।** 'तळे राखील तो मासे चाखील' ही मराठी म्हण साक्षात सिद्ध करणारी एक धक्कादायक घटना नाशिक जिल्ह्यात समोर आली आहे. पाटबंधारे विभागातील एका वर्ग एकच्या अधिकाऱ्याने थेट आपल्या अधिकारांचा गैरवापर करत पत्नीच्या नावावर शासकीय कंत्राट मिळवल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.

जल व्यवस्थापनाची जबाबदारी असलेल्या या वरिष्ठ अधिकाऱ्यानेच पिंजरा पद्धतीने मत्स्यपालनाचे ठेकेदार म्हणून पत्नीच्या नावाने दोन वर्षांपासून काम सुरू केल्याची माहिती मिळाली आहे. विशेष म्हणजे, ज्या प्रकल्पांसाठी तो अधिकारी खुद्द अनुमती व अंमलबजावणी प्रक्रियेत सहभागी आहे, त्याच प्रकल्पाचा लाभ आपल्या कुटुंबीयांसाठी ओढून घेतल्याचा आरोप आहे.

सदर प्रकाराची तक्रार थेट सिंचन विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांच्याकडे दाखल करण्यात आली असून, या प्रकरणामुळे विभागात प्रचंड हलकल्लोळ माजला आहे. संबंधित अधिकाऱ्याची ओळख गुलदस्त्यात ठेवण्यात आली असली तरी "कोण आहे हा भ्रष्टाचारी?" यावर चर्चेला उधाण आले आहे. शासन निर्णयाच्या पायदळी पाळी! राज्य शासनाने १८ जानेवारी २०२३ रोजी पिंजरा पद्धतीने मत्स्य संवर्धनासाठी विशेष धोरण जाहीर केले होते. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेंतर्गत २०२२-२३ मध्ये अर्थसहाय्य मिळाले असून, जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून तलावांमध्ये प्रकल्प उभारणीसाठी जागा निश्चित करण्यात येत होती.ही समिती म्हणजेच योजनेची मार्गदर्शक यंत्रणा होती ज्यात मत्स्य विभागाचे अधिकारी, दुग्ध विकास अधिकारी, तसेच पाटबंधारे विभागाचे सहाय्यक कार्यकारी अभियंता देखील होते. याच समितीतील अभियंत्याने आपल्या पदाचा वापर करून स्वतःच्या पत्नीच्या नावाने ठेका उचलल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

### लोकांसाठी असलेली योजना 'घराणेशाही'साठी?

सदर प्रकल्प जनसामान्यांसाठी असताना, त्याची माहिती गुप्त ठेऊन संबंधिताने आपल्या घरातच लाभ ओढून नेल्याने शासकीय धोरणांची अक्षरशः थट्टा झाली आहे. सिंचन विभागाच्या जबाबदारीत जनजागृती असूनही, लाभार्थी म्हणून स्वतःचाच छुपा सहभाग ठेवणे हे गंभीर शासकीय उल्लंघन ठरते. कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने कुटुंबीयांच्या नावावर व्यवसाय सुरू करायचा असल्यास त्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते. मात्र या प्रकरणात अशा कोणत्याही परवानगी घेतली नसल्याचे तक्रारीत स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, याबाबत संबंधित अधिकाऱ्याला विचारणा केली असता त्या अधिकाऱ्याने काहीही उत्तर देण्यास नकार दिला त्यामुळे या प्रकरणातील संशय अधिकच बळाकट झाला आहे.या सगळ्या प्रकरणामुळे आता प्रशासकीय यंत्रणेतील नैतिकता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर मोठा प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे. आपले पद वापरून गुपचूप ठेके मिळवणाऱ्यांवर कारवाई होणार का, की हे प्रकरणही 'झाकली मूठ' म्हणून गप्प राहणार? हा सवाल उपस्थित केला जात आहे.या प्रकरणात तत्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्याविरोधात कडक शिस्तभंगाची कारवाई केली नाही, तर इतर अधिकारीही असेच 'तळे राखून मासे खाण्यास' प्रवृत्त होतील, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

# हिऱ्यांचा भाजप प्रवेश म्हणजे 'प्रथमग्रासे मक्षिकापात'



**नाशिक ।** संस्कृतमध्ये एक म्हण आहे 'प्रथमग्रासे मक्षिकापात'. या म्हणीचा मराठीत अर्थअसा आहे की, एखादी चांगली गोष्ट सुरू होतानाच त्यात काहीतरी विघ्न येणे किंवा अडचण निर्माण होणे असा आहे. म्हणजेच, एखाद्या कामाची किंवा गोष्टीची सुरुवात चांगली झाल्यावरही त्यात काहीतरी नकारात्मक घडते. डॉ. अपूर्व हिरे यांच्या मागे लागलेला चौकशांचा ससेमिरा वाचविण्यासाठी त्यांना सत्ताधारी पक्षात जाणे गरजेचे होते. पण त्या ठिकाणी दादा भुसे फणा काढून बसले असल्यामुळे त्यांची डाळ काही शिजत नव्हती. अखेरीस भारतीय जनता पक्षात प्रवेश केला, तर गृह खाते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्यामुळे अनेक चौकशी गुंडाळल्या जातील, या अपेक्षेने मोठा गाजावाजा करीत व आपल्या शेकडो किंवा हजारो (?) कार्यकर्त्यांसह त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय जाहीर केला. परंतु प्रवेश करण्यापूर्वीच त्यांच्याच शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांनी दिलेला दणका म्हणजे पहिल्याच घासाला माशी लागणे असेच म्हणावे लागेल.

हिरेंच्या राजकारणाला ओहटी लागण्याचे कारण म्हणजे एक मोठी शिक्षण संस्था त्यांच्या हातात असूनही कर्मचाऱ्यांना त्रास देणे हा त्यांचा आवडता छंद दिसतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कर्मचाऱ्यांचे वेतन थकविणे किंवा बुडविणे याबाबतीत तर आता त्यांची संपूर्ण जिल्ह्यात विशेष ओळख झाली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या शिक्षण संस्थेत नोकरीस असलेले शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी हे आपले गुलामच असतात असे त्यांनी गृहीत धरलेले आहे.

राजकारणातील या परिवाराची धरसोड वृत्ती आता जिल्ह्याला परिचित झाली आहे. त्यांच्या बाबतीत कार्यकर्तेच आता एकमेकाला विचारतात की 'सध्या आपण कोणत्या पक्षात आहोत?' याच परिवारातील डॉ. अद्वय हिरे याबाबतीत मात्र विचारावर ठाम दिसतात. तुरुंगात जाण्याची वेळ आली तरी त्यांनी ठाकरेंचे शिवसेना सोडली नाही. त्यांच्या वाट्याला तर मोठा संघर्ष आला. पण त्यातूनही ते बाहेर पडले. भविष्यात मात्र काही सांगता येणार नाही. एवढी मोठी शिक्षण संस्था ताब्यात असतांना राजकारण कसे करावे हे त्यांना कोण सांगणार? या परिवारातील प्रत्येकाकडे एवढे पीए झाले की, कावळ्याच्या छत्रीप्रमाणे सर्वत्र पीएच दिसतात. प्रत्येकाला काय जबाबदारी दिलेली असते हे समजायला तयार नाही. त्यातही हे पीए कुणालाच जुमानत नाही. हिरे परिवाराशी संपर्क साधायचा असला तर ते पीएच्या माध्यमातून करावा लागतो. त्यांनी संपर्क करून दिला तर ठीक, अन्यथा विषय संपला. वृत्तपत्राशी संबंधित काम करणारा एक पीए तर मला विचारल्याशिवाय हिऱ्यांचे पान हालत नाही असे गर्वाने सांगतो. मी हिरेंचा जवळपास 'मानसपुत्रच' आहे अशी दर्पोक्ती त्याच्याकडून सतत वर्तवली जाते. त्याच्या या दर्पोक्तीला वैतागून अनेकांनी सहा-सात महिन्याचा पगार बाकी असतानाही त्यांच्या मालकीच्या वृत्तपत्रातील नोकरीवर पाणी सोडले.

### हिरेंच्या पक्षप्रवेशाने मालेगावातील वाद मिटतील?

माजी आमदार अपूर्व हिरे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यामुळे त्यांची राजकीय नाव कदाचित तिराला लागेल. परंतु मालेगावमध्ये हिरे-भुसे वाद कसा मिटेल, यासाठी मात्र त्यांना अपार मेहनत करावी लागेल. त्यांचे बंधू अद्वय हिरे यांनाही भविष्यात त्यांना भाजपमध्ये आणावेच लागेल. कारण एकाच घरातील दोन भाऊ वेगवेगळ्या पक्षात राहिले, तर हिरे कुटुंबाची नेमकी भूमिका काय हे मतदारांना कसे भावेल? तसेच संस्थेतील कर्मचारी व संस्थाचालक यांच्यातील जे वाद आहे, ते एकदाचे त्यांना बसवून मिटवावेच लागेल. कारण न्यायालयीन लढाया इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू आहे की, त्यातच हा परिवार गुरफटला गेला आहे. परंतु त्यांच्याकडे एकही सल्लागार योग्य पद्धतीचा दिसत नाही. तरीपण भारतीय जनता प्रवेश करून त्यांनी एक पाऊल सकारात्मक टाकले हे मात्र त्यांच्या हिताचे झाले. भाजपमध्ये आल्यामुळे मालेगावच्या राजकारणात फारसा फरक पडेल असे दिसत नाही कारण दरबारी राजकारणामुळे हिऱ्यांचे आणि अन्य राजकारणाचे फारसे जमणारच नाही हा आजपर्यंतचा इतिहासच सांगतो.

# प्रीतिसुधाजी शिक्षण फंडद्वारे गुणवंत विद्यार्थी सत्कार



**नाशिक ।** जैन श्वेतांबर स्थानकवासी श्रीसंघ नाशिक अंतर्गत प.पू. श्री प्रीतिसुधाजी शिक्षण फंड द्वारे इयत्ता पहिली ते नववी मधील सर्वोत्कृष्ट यश मिळवणाऱ्या १३५ विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह संपन्न झाला. धनदाई लॉन्स येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी अजित शांतीलाल बोरा होते. उपस्थित सर्वांसाठी गौतम प्रसादी (महाप्रसाद) ची व्यवस्था विजय टाटिया यांच्याकडून केली गेली.

सर्व विद्यार्थ्यांना उपयोगी अशा शैक्षणिक साहित्याचे वाटप के.आर. बेदमुथा ग्रुप, ब्रिजलाल कटारीया व सौ प्रभा ललित मोदी यांनी केले. व्यासपीठावर विशेष अतिथी श्रावक संघाचे संघपती मंगलचंद साखला व प्रमुख अतिथी डॉ. भक्ती कटारिया- दुगड, आनंद चोरडिया, मीरा संचेती, किशोर बाफना, के आर बेदमुथा, नंदकिशोर साखला, शिक्षण फंडाचे अध्यक्ष विजय बेदमुथा, कार्याध्यक्ष जे सी भंडारी, सेक्रेटरी अँड. विद्युलता तातेड, खजिनदार ललित मोदी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना विशेष शैक्षणिक मार्गदर्शन न्यू इरा स्कूल च्या संचालिका सुनिता बोहरा यांनी केले. शिक्षण फंडाबद्दल आवाहन कार्याध्यक्ष जे सी भंडारी यांनी व प्रस्तावना फंडाच्या सेक्रेटरी अँड विद्युलता तातेड यांनी मांडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सीए. लोकेश पारख व डॉ संगीता बाफना यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यकारणी सदस्य मोहनलाल लोढा, लखमीचंद पारख, हेमा लुंकड, राजेंद्र डुंगरवाल, मनिषा चोपड़ा, डॉ. सुषमा दुगड, डॉ.कन्हैयालाल बलदोटा, बाळचंद संचेती, महेंद्र बोरा, विजय डोशी, अतुल आचलिया, संदिप गांग, निलेश भंडारी, हेमंत चोरडिया, मगनलाल बागमार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महापालिकेतर्फे शाळाबाह्य मुलांसाठी शोध मोहीम सुरू



**नाशिक ।** नाशिक महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे दिनांक १ जुलै ते १५ जुलै या कालावधीत शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष शोध मोहीम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ बुधवारी (दि. २) श्रमिकनगर, जेल रोड, नाशिक रोड येथे विभागीय शिक्षण उपसंचालक संजयकुमार राठोड यांच्या उपस्थितीत व प्रशासनाधिकारी डॉ. मिता चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. शिक्षणहक्क कायद्यानुसार ६ ते १४ वयोगटातील कोणतेही मूल शाळेच्या बाहेर राहू नये, या उद्देशाने ही मोहीम राबवण्यात आली. मोहीमेदरम्यान, काही स्थलांतरित कामगारांच्या वस्त्यांमध्ये शाळाबाह्य मुले व मुली आढळून आली. संबंधित पालकांशी संवाद साधून त्यांना शाळेच्या महत्त्वाबाबत जागरूक केले गेले. मुलांची नोंद घेऊन त्यांना लवकरात लवकर शाळेत प्रवेश मिळावा यासाठी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया राबविण्याचे आश्वासन दिले गेले. या मोहिमेअंतर्गत शाळा क्र. ५६, जेलटाकी परिसरातील कॅनॉल रोड, झोपडपट्टी, इंदिरानगर, श्रमिकनगर, भगवा चौक, ट्रॅक्शन रोड या भागात प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले. शिक्षकांनी शोधून काढलेल्या शाळाबाह्य मुलांचे फुल देऊन स्वागत राठोड यांनी केले. यावेळी पालकांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, "कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहता कामा नये." प्रशासनाधिकारी डॉ. मिता चौधरी यांनी मोहिमेत आढळलेल्या शाळाबाह्य मुलांचा गौरव करत महिला पालकांशी संवाद साधून मुलांना नियमितपणे शाळेत पाठवण्याचे आवाहन केले. मोहिमेदरम्यान शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, पर्यवेक्षक, शिक्षक, अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविका यांनी श्रमिक वस्तीमध्ये जाऊन घरोघरी सर्वेक्षण केले. या प्रयत्नातून २ मुले व १ मुली शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले. यांची नोंद घेऊन त्यांना साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, मनपा शाळा क्र. ५६ येथे तत्काळ दाखल करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थिनींनी शाळाबाह्य विद्यार्थ्यांमध्ये जागृती घडवण्यासाठी वाद्य संगीत, गीत सादरीकरण व पथनाटिका सादर केली. या उपक्रमात मुख्याध्यापक व पर्यवेक्षक वसंत विसपुते, विशेषतज्ञ प्रल्हाद हंकारे, शिक्षक किसन अहिरे आदी उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### सीमाराणी बागुल यांना साहित्य साधना पुरस्कार प्रदान

**नाशिक ।** साहित्यकणा फाउंडेशन व भाव सुमन प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



कार्यक्रमात नाशिक येथील रहिवासी उपक्रमशील प्राथमिक शिक्षिका कवियत्री सीमाराणी बागुल यांचा दुसरा काव्यसंग्रह गर्भारलेल्या मातीतून या काव्यसंग्रहास साहित्य साधना पुरस्कार प्रा, कवयित्री शकुंतला चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ कवयित्री सुशीला पिंपरीकर, पत्रकार पियुष नासिककर तसेच कार्यक्रमाचे आयोजक कवी विलास पंचभाई, कवी संजय गोराडे मंचावर उपस्थित होते. अकरा साहित्यिकांना साहित्य साधना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच साहित्य यात्री या प्रातिनिधिक कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. सदर कार्यक्रमात उपस्थित कवी उत्तम कोळगावकर राज शेळके नंदकिशोर ठोंबरे, सुहास टिपरे, नलिनी बागुल, वैशाली जाधव, माधुरी अमृतकर अपर्णा येवलेकर माणिकराव गोडसे उपस्थित होते.

# आव्हाने पेलत घडलेला युवा दिग्दर्शक : श्याम उर्फ घनश्याम पवार









सांस्कृतिक
**पूजा भावसार**
**९३२६९१४७०१**

दिग्दर्शकाचा कुठलाही अनुभव गाठीशी नसताना या क्षेत्राची आवड, याच क्षेत्रात करिअर करण्याची प्रबळ इच्छा आणि त्यासाठी कठोर मेहनत करण्याची तयारी या बळावर नाशिक जिल्ह्यातील घनश्याम शिवाजी पवार या युवा कलावंताने अल्पावधीत दिग्दर्शक म्हणून स्वतःची चांगली ओळख निर्माण केली आहे. ज्येष्ठ व अनुभवी दिग्दर्शकाच्या हाताखाली काही काळ सहाय्यक म्हणून धडे घेतल्यानंतर श्यामने दिग्दर्शक म्हणून स्वतंत्र काम सुरू केले.


नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील रहिवासी असलेल्या पवार परिवाराने श्यामच्या या दिग्दर्शनाच्या छंद तथा आवडीला नेहमीच प्रोत्साहन दिले. घरातून पाठिंबा मिळाल्याने श्याम यांनी संधीचे सोने करीत स्वतःला एक प्रतिभावंत दिग्दर्शक म्हणून अनेक चित्रपट-मालिका कृतींतून सिद्ध केले. मालेगाव येथेच शिक्षणाचे धडे गिरवल्यानंतर सुरुवातीला त्यांनी काही काळ आयकर विभागात नोकरीही केली; पण त्यांचे तेथे मन रमले नाही. श्याम यांचा कलाक्षेत्रातील प्रवास सुरू झाला. कलाक्षेत्र, त्यातल्या त्यात दिग्दर्शनाचे क्षेत्र जणू त्यांना खुनावत होते. त्या दृष्टीने त्यांनी वाटचाल सुरू ठेवली. "महाराष्ट्राची लोकधारा" या कार्यक्रमाशी ते यातूनच जोडले गेले आणि त्यांना त्यांचा मार्ग गवसला. कलर्स मराठीवर प्रदर्शित होणाऱ्या "गणपती बाप्पा मोरया" या सिरीयल तथा मालिकेच्या त्यांनी सुमारे १०० भागांसाठी ज्येष्ठ दिग्दर्शक चंदू गायकवाड यांच्या हाताखाली सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. त्यानंतर अनेक सिरियल्स, मराठी चित्रपटांच्या दिग्दर्शकाचे काम त्यांनी केले.

"असं सासर सुरेख बाई" या कलर्स मराठीवर प्रदर्शित होणाऱ्या सिरीयलचेही दिग्दर्शनाचे काम केले. "जैतर" या मराठी चित्रपटाचे संपूर्ण दिग्दर्शन त्यांनी स्वतंत्रपणे केले. त्यानंतर त्यांचा या क्षेत्रात धडाकेबाज प्रवास सुरू झाला. "सारं काही तुझ्यापाशी" या सोनी मराठीवरून प्रदर्शित होणाऱ्या सिरियल्सचे काम त्यांनी स्वतंत्रपणे केले. "तुझं माझं सपान" या सिरियलच्या ४५० भागांचे श्याम यांनी दिग्दर्शन केले आहे. "सुंदरा मनात भरली" या सिरीयलचेही त्यांनी सुमारे ९०० भागांचे दिग्दर्शन केले आहे. त्यांनी दिग्दर्शित केलेला "लवनीती" हा मराठी चित्रपट प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. लवकरच तो रुपेरी पडद्यावर दिसेल. चित्रीकरणाच्या निमित्ताने त्यांचा नाशिक-मुंबई असा नेहमी प्रवास सुरू असतो. श्याम यांचा जणू पिंडच दिग्दर्शनाचा आहे, असे त्यांच्या एकंदरीत प्रवासावरून जाणवते. दिग्दर्शक हा चित्रपट मालिका नाटकाचा खरा अर्थाने मुख्य भाग असतो. दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनानेच ती ती चित्रपट, मालिकाकृती परिपूर्ण आकाराला येत असते. त्यामुळे दिग्दर्शकाचे कसब पणाला लागते. ते कसब श्याम यांनी आत्मसात केले आहे.

श्याम यांचे गेल्या अनेक वर्षापासून नाशिकमध्येच वास्तव्य आहे. हे क्षेत्र तसे आव्हानात्मक असल्याचे सांगताना या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांनी पहिले आर्थिक सक्षम असणे आवश्यक असल्याने श्याम यांनी सांगितले. मोठ्या संधी मिळेपर्यंत कलावंतांसाठी सिरियल्स हे चांगले व्यासपीठ ठरत असल्याचेही त्यांनी सांगितले. ८० टक्के कलावंत या सिरियल्सवर अवलंबून असल्याचेही ते म्हणाले. काम नसतानाचा काळ व्यतीत करताना कलावंतांची ससेहोलपट होते. त्यामुळे त्यांनी अर्थांजनासाठी अन्य मार्गही खुले ठेवायला हवे, असे त्यांना वाटते. श्याम यांना भविष्यातही याच क्षेत्रात जम बसवायचा आहे. करिअर घडवायचे आहे. त्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू आहे. कमी कालावधीत त्यांनी आव्हानात्मक अशा दिग्दर्शन क्षेत्रात मैलाचा दगड गाठला आहे. नाशिक नगरी चित्रपट, मालिकांसाठी पोषक आहे. असे असले तरी नाशिकमधून या क्षेत्रात जाण्यासाठी त्या तुलनेत संधी कमीच असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. त्यामुळे त्यांचा नाशिक-मुंबई असा प्रवास नित्याचा असतो. चित्रीकरणाच्या निमित्ताने त्यांना भ्रमंती करावी लागते. यातूनच या क्षेत्रातील अनेक सकस माणसं त्यांच्याशी जोडली गेली आहे.

नाशिकमध्ये लवकरच होणारा कुंभमेळा हा काही भारतीय जनता पक्षाचा इव्हेंट नाही. भारतातीलच नव्हे तर जगभरातील हिंदूंचा तो एक श्रद्धेचा विषय आहे. परंतु अलीकडच्या काळात भारतीय जनता पक्षाने तो फक्त आमचाच विषय आहे, असे गृहीत धरून विरोधी पक्षांना खूप दूरवर ठेवले आहे. वाईट या गोष्टीचे वाटते की, 'अजातशत्रू' म्हणून गणले गेलेले नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांना देखील कुंभमेळ्याच्या बैठकांना निमंत्रित केले जात नाही. एवढेच कशाला तर समृद्धी महामार्गाच्या उद्घाटनाला व महामार्ग राजाभाऊ वाजे यांच्या मतदारसंघातून जातो, तरी देखील त्यांना त्या उद्घाटन सोहळ्याला निमंत्रित करण्यात आले नाही. याला 'सत्तेचा माज' हा शब्द वापरल्याशिवाय दुसरा कोणता शब्द उरतो. मुळातच राजाभाऊ वाजे हे संयमी व्यक्तिमत्व आहे. परंतु आपल्या अधिकाराला जर कोणी धक्का देत असेल, तर त्यांनी आता आक्रमक व्हायलाच सुरुवात करावी. त्यांना दूर ठेवून कुंभमेळ्याशी संबंधित मंत्री गिरीश महाजन आततायीपणा करीत असेल, तर तो नाशिक जिल्ह्यातील जनतेचा देखील अपमान आहे. कारण नाशिकच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधीलाच ते दूर ठेवू इच्छितात. नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत आतापर्यंत विविध बैठका झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या मंत्र्यांनी त्याला हजेरी लावली. संबंध प्रक्रियेत महाविकास आघाडीतील मोजक्या नेत्यांची आणि पक्षांचीच हजेरी होती. त्यामुळे तो चर्चेचा विषय आहे. मुख्यमंत्र्यानंतर गिरीष महाजन यांच्या उपस्थितीत त्र्यंबकेश्वर आणि नाशिक येथे साधू महंतांची बैठक झाली. या बैठकांमध्ये साधू, महंत आणि आगामी कुंभमेळ्या बाबत विविध निर्णय झाले. प्रशासकीय अधिकारी आणि मंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत एकंदरच भारतीय जनता पक्षाचे प्राबल्य दिसले. नाशिक जिल्ह्यात महायुतीचे तीन स्थानिक मंत्री आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि औषध व प्रशासन मंत्री नरहरी झिरवड आहेत. शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आहेत. मात्र या मंत्र्यांची सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बैठकीला अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. पण त्या अनुपस्थितीचे कारण त्यांनी कधीही कुणाला सांगितले नाही. त्यामुळे त्यांची अवस्था 'सहन होत नाही आणि सांगताही येत नाही' अशी झाली आहे. जिल्ह्यात राजाभाऊ वाजे आणि भास्कर भगरे हे दोन खासदार आहेत. ते विरोधी पक्षाचे आहेत. त्यामुळे त्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामकाजात फारसे विश्वासात घेण्यात येतच नाही. राज्य शासन खासदारांना कुंभमेळ्याच्या तयारीबाबत विश्वासात घेत नसेल, तर जनतेने आता रस्त्यावर येऊन सत्ताधाऱ्यांना जाब विचारला पाहिजे. खासदार वाजे यांच्यासह कृषी मंत्री माणिकराव कोकाटे आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे या दोन्ही मंत्र्यांनाही जाणीवपूर्वक कुंभमेळ्याच्या तयारीच्या कामकाजापासून अलिप्त ठेवले आहे. त्यामुळे आता राजाभाऊंनी सहनशीलता थांबवून जाब विचारण्याची भूमिका घेतली पाहिजे. नाशिक जिल्ह्यातील जनतेने निवडून दिलेले तुम्ही प्रतिनिधी आहात. आता वाघ नखं बाहेर काढल्याशिवाय समोरचे दाद देणार नाही. चला तर जनता तुमच्या बरोबर आहे हे ध्यानात घ्या!





# राजाभाऊ, वाघ नखं बाहेर काढायची वेळ आली आहे!

विरोधी आवाज दाबणं ही लोकशाहीची गळचेपी असते. विरोधी पक्ष म्हणजे शत्रू नव्हे, ते ही जनतेचे प्रतिनिधीच आहेत. त्यांना बोलू न देणं, कामकाजापासून दूर ठेवणे हे लोकशाहीला कमकुवत करणं आहे. एका बाजूला राजाभाऊ वाजेंना संस्थांच्या कामापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सुरू असताना त्यांनी मात्र वर्षभरापासून नाशिक रोड ते द्वारका उड्डाणपुलासाठी प्रयत्न सुरू केले. पण पुढे पुढे करण्याची समय नसलेल्या वाजेंनी नितीन गडकरी यांच्याशी थेट संपर्क करून त्यांच्या सूचनेनुसार त्यांचे प्रयत्न सुरूच ठेवले. नाशिक मेट्रोबाबतही महारेलने सकारात्मकता दाखवावी यासाठी नाशिकमध्ये बैठक आयोजित केली होती. नाशिकरोड ते द्वारका उड्डाणपूल तसेच नाशिक मेट्रो यांच्याबाबत मागच्या काही वर्षांमध्ये फक्त चर्चा घडताना दिसून येतात. तसेच, नेत्यांकडून याबाबत घोषणा देखील होत असतात, मात्र कुठेही ठोस असे उत्तर नाशिककरांना मिळताना दिसून येत नव्हते. मात्र खासदार राजाभाऊ वाजे यांनी या दोन्ही प्रकल्पांसाठी पाठपुरवठा करायला सुरुवात केली आणि यामध्ये ठोस अशी पावलं प्रशासनाच्या वतीने उचलण्यासाठी प्रशासनाकडे तगादा लावला. याचेच पुढचे पाऊल म्हणजे महामेट्रो आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यामधील समन्वयातून नाशिक रोड ते द्वारका उड्डाणपूलाचे रखडलेले काम मार्गी लावण्यासाठी दोन्ही विभागांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत आहे. या संदर्भात महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रवण हर्डीकर यांची भेट घेत याबाबत सविस्तर चर्चा केली. यामध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सूचनेनुसार नाशिक रोड ते द्वारका उड्डाणपूल करत असताना त्याचं स्ट्रक्चर महारेलच्या दुमजली उड्डाणपुलाच्या अनुषंगाने करायचे असल्याने त्याबाबत महा मेट्रोची हरकत नसावी, याबाबत सविस्तर चर्चा केली. श्री हर्डीकर यांनी खासदार वाजे यांच्या सोबत झालेल्या बैठकीत याबाबत सकारात्मकता दर्शवली असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जर उड्डाणपूल करत असेल, तर महा मेट्रो साठी जागा राखीव ठेवण्याची विनंती महा मेट्रोच्या वतीने केली जाईल असे यावेळी हर्डीकर यांनी सांगितले. नाशिकसाठी प्रस्तावित असलेली मेट्रो ही एक वेगळ्या प्रकारची आधुनिक प्रणाली असणार आहे, जी थेट रस्त्यावर चालणारी "आर्टिक्युलेटेड बस मेट्रो" असेल अशी माहिती हाती येत आहे. विकास कामांच्या बाबतीत गडकरी कधीही राजकारण करत नाही हे संपूर्ण देशाला माहीत झाले आहे. ज्यावेळी खा. वाजे यांनी नाशिक रोड ते द्वारका या उड्डाणपुलासाठी नितीन गडकरी यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला, त्यावेळी गडकरी यांना स्थानिक वस्तूस्थिती तसेच महामेट्रोच्या प्रकल्पामुळे उड्डाणपूल देखील रखडला असल्याची माहिती दिली असता त्या बैठकीत गडकरी यांनी अशी सूचना केली की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या माध्यमातून हा उड्डाणपूल उभारला जाईल. हा प्रकल्प उभारत असताना त्यावर डबल डेकर उड्डाणपूल करून वरील बाजूस मेट्रोसाठी जर जागा ठेवायची असेल तर महा मेट्रो कडून त्याबाबत ना हरकत तसेच मागणी आली तर आपल्याला हा प्रकल्प पुढे नेता येईल. त्यानंतर वाजेंनी त्या दृष्टीकोनातून पावलं उचलायला सुरुवात केली. आता महा मेट्रो सोबत झालेल्या बैठकीनंतर पुढील बैठक नागपूर येथे होऊन नाशिक रोड ते द्वारका उड्डाणपुलाच्या कामाला कुठेतरी सुरुवात होईल अशी शक्यता दिसून येत आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

## एज्युकेशन हब करण्यासाठी राजाभाऊंचा पुढाकार

नाशिकच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा सिपेट (सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनीअरिंग) प्रकल्प नाशिकमध्ये लवकरच सुरू व्हावा, यासाठी खा. वाजेंनी मागील एक वर्षभरा पासून जोरदार पाठपुरावा सुरू केला आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून त्यांनी नुकतीच संभाजीनगर येथील सिपेट संस्थेला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान सिपेटचे कामकाज कसे चालते, याबाबतची सविस्तर माहिती घेतली. सिपेट नाशिकमध्ये सुरू झाल्यावर नाशिकच्या तरुणांना रोजगार मिळण्यासाठी कसा फायदा होईल, तसेच प्लास्टिक उत्पादन आणि संबंधित उद्योगांना याचा कसा लाभ मिळेल, याची त्यांनी पाहणी केली. सिपेट संस्थेचे प्रमुख आणि संचालक यांनी त्यांना प्रकल्पाच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. गेल्या अनेक दिवसांपासून नाशिकमध्ये सिपेट प्रकल्पासाठी जागा मिळवण्यावरून मतमतांतरे होती. हा विषय मार्गी लागावा यासाठी त्यांनी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आणि महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून, काही दिवसांपूर्वीच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाशिक येथे सिपेटसाठी दहा एकर जागा देण्याची घोषणा केली आहे. सध्या या प्रकल्पाची फाईल महसूल मंत्रालयाकडून कौशल्य विकास मंत्रालयात आली आहे. या प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी देखील सातत्याने प्रयत्न सुरू असून लवकरच सर्व तांत्रिक बाबी पूर्ण होऊन प्रकल्प उभारणीला सुरवात होण्याची आशा आहे. नाशिकमध्ये सिपेट इन्स्टिट्यूटची लवकर स्थापना व्हावी यासाठी केंद्रीय सचिव निवेदिता शुक्ला यांची भेट घेऊन चर्चा केली होती. या प्रकल्पामुळे नाशिकमधील तरुण पिढीला प्लास्टिक निर्मितीचे आधुनिक शिक्षण मिळेल आणि स्थानिक उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल.

## ➤ महत्त्वाचे

### रोटरी क्लब ऑफ बागलाणच्या अध्यक्षपदी महेश सूर्यवंशी रोहित शिंदे सचिव

**निरपूर ।** सटाणा येथील रोटरी क्लब ऑफ सटाणा बागलाणच्या अध्यक्षपदी नवे निरपूर विविध कार्यकारी सह. सोसायटीचे सभापती





महेश सूर्यवंशी यांची अध्यक्षपदी तर प.ध.पाटील मराठा इंग्लिश स्कूलचे उपशिक्षक रोहित शिंदे यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ सटाणा बागलाण रोटरॅक्ट क्लब ऑफ बागलाण प्राइडच्या 2025 -26 ची नवीन कार्यकारिणी निवडीसाठी रोटरीची विशेष बैठक बोलावण्यात आली या बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन सर्वांनु मते नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या बैठकीत अध्यक्षपदी महेश सूर्यवंशी तर सचिव पदी रोहित शिंदे, खजिनदारपदी उमेश सोनी यांची एक मताने निवड झाली, रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्षपदी सुयोग अहिरे व सचिव पदी आयुष येवला यांची निवड करण्यात आली. सटाणा क्लब ऑफ सटाणा प्राईडचे अध्यक्षपदी मनीष शेलार तर सचिवपदी हर्षदा पाटील यांची ही निवड करण्यात आली. सटाणा येथे दगाजि सिने पॅलेस येथे वायसीएम हॉस्पिटल पुणेचे माजी अधिष्ठाता डॉ. पद्माकर पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ होणार आहे. रोटरी ३० चे प्रांतपाल नाना शेवाळे अध्यक्षस्थानी असतील. बागलाणचे आ. दिलीप बोरसे, उपप्रांतपाल अरुण पवार हे प्रमुख पाहुणे असतील.

### रोटरी अंबड, डेल्टा फिनो केमतर्फे रक्तसंकलन वाहन हस्तांतरण

**सिडको ।** रोटरी अंबड आणि डेल्टा फिनो केम प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने जनकल्याण रक्त केंद्र येथे रक्त संकलन व्हॅन हस्तांतरण करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब नाशिक अंबडचे अध्यक्ष रोटेरियन चारुदत्त रायते यांनी मनोगत व्यक्त केले डेल्टा फिनोकमचे संस्थापक अध्यक्ष रोटरी डिस्टिक 3030 चे माजी प्रांतपाल दादासाहेब देशमुख व शरयू देशमुख यांच्या हस्ते रक्त संकलन वाहन जनकल्याण रक्त केंद्र गंगापूर रोड नाशिक यांना हस्तांतरित करण्यात आले. सदरहू प्रकल्प यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रोटरी जॉईंट सेक्रेटरी विपुल लोडया आणि डिस्टिक सेक्रेटरी सीएसआर प्रोजेक्ट रवी महादेवकर यांनी विशेष परिश्रम घेतले. रोटरी अंबडतर्फे सचिव डॉ.धनंजय अहिरे ,डॉ. अजित भामरे आदी उपस्थित होते.

## जनता विद्यालय, कोमलवाडीस शैक्षणिक साहित्य वाटप



**सिन्नर ।** उपकृषी अधिकारी सिन्नर, यांच्याकडून जनता विद्यालय कोमलवाडीस व्हाईट बोर्डचे वितरण करण्यात आले. येथील सिन्नर जनता विद्यालयास सिन्नर तालुका उपकृषी अधिकारी श्री रणजीत आंधळे यांनी व्हाईट बोर्ड भेट म्हणून दिला. यावेळी सिन्नर तालुका पोकरा योजना अंतर्गत आयोजित निबंध स्पर्धा बक्षिस वितरण प्रसंगी श्री रणजीत आंधळे विद्यालयास व्हाईट बोर्ड देण्याचे आश्वासन दिले होते. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले' याप्रमाणे साहेबांनी विद्यालयास बोर्ड भेट देऊन याची प्रचिती दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने उपयुक्त शैक्षणिक साहित्याची गरज लक्षात घेऊन ही भेट दिली. यावेळी तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे, सहाय्यक कृषी अधिकारी मेघा पेढेकर विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक तसेच बाजीराव ढोमसे, केशव वळवी, सचिन गिते, सागर भदाणे, मनीषा गोराडे, स्वाती जोंधळे, चित्रा बाजारे, ऋतुजा वाघ, सुदर्शन गांडुळे ,सागर बस्ते, सौरभ कमानकर आदीसह विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.तर मनीषा गोराडे यांनी आभार मानले.

## एआरइएएस फाउंडेशन संस्थेस ओझरच्या नागरिकांनी केली मदत

**ओझर ।** मागील गेल्या दोन दशका पेक्षा जास्त कालावधी पासून निसर्ग क्षेत्रात येथील तरुण मंडळी निःस्वार्थ भावनेतून कार्य करत आहेत. त्यांचे कार्य बघून ओझरकर नागरिकांनी निसर्गाचा समतोल राखण्यासाठी कार्य करणाऱ्या तरुणांना मदत करुन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली आहे.

सिमेंटचे जंगल वाढल्याने निसर्गाची हानी होत आहेत त्यातच साप व अन्य सरपटनारे प्राणी लोकवस्ती कडे येत असतांना बिबटया सारखा वन्यजीव देखील लोकवस्ती व शेत वस्ती वर येऊन पशुधन व कधी कधी चुकीने मनुष्यावर हल्ला करत आहेत. या सगळ्या प्राण्यांना वनविभागाच्या मदतीने सुरक्षित पकडून पुन्हा जंगलात सोडले जात आहे. यामुळे वन्यजीव व मनुष्य दोघांचाही जीव वाचतो. या निःस्वार्थ केलेल्या कामाची पावती म्हणून ओझरच्या नागरिकांनी नाशिक जिल्ह्यात कार्यरत असलेली ए.आर.इ.ए.एस. फाउंडेशन संस्थेच्या सदस्यांना त्यांच्या स्वतः चे संरक्षण होण्यासाठी जंगल शूज भेट दिले आहेत. जेणेकरून साप पकडताना किंवा जंगलात जात असतांना कुठलेही इजा होणार नाही व काम अधिक सोपे होईल. ओझर मधील गोपीनाथ दौलत पल्हाळ, शिवाजी किसन पाटील, ज्ञानेश्वर त्र्यंबक कदम, पांडुरंग बाबुराव आहेर, बापूसाहेब धोंडीराम चौधरी, बाळासाहेब लक्ष्मण पगार, विष्णू शिवाजी पगार, नरेंद्र दुबे यांनी मदतकेली आहे. या मदतीने चांगली सुरवात झाली असून यापुढेही काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळाल्याची भावना व्यक्त करत एआरइएएस फाउंडेशनचे संचालक वन्यजीव अभ्यासक सुशांत रणशूर व त्यांचे सहकारी मंगेश चारोस्कर, हेमंत वानले, संदीप कराटे, राजेश शेजवळ, मोहन जगताप, देविदास सताळे यांनी दात्यांचे आभार मानले आहेत.



> आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून साप आणि इतर वन्यजीव पकडण्यासाठी ए.आर.इ.ए.एस.फाउंडेशन चे सदस्यांना फोन करुन बोलावत असतो आणि ते सदस्य निःस्वार्थ भावनेने काम करतात म्हणून आपण ही समाजाचे काही देणं लागतो या भावनेतून आम्हीं त्यांना मदत केली. ती मदत नक्कीच सार्थकी लागली.
>
> – **शिवाजी पाटील, ओझर**

## महावीर इंटरनॅशनल, मनु मानसी महिला सेवाभावी संस्थेचा उपक्रम

### ७० मान्यवरांच्या सन्मानासह जीवन गौरव पुरस्काराचे वितरण

**नाशिक ।** महावीर इंटरनॅशनल आणि मनु मानसी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जीवन गौरव पुरस्काराचे वितरण द पवार गार्डन, नाशिक येथे करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रमुख अतिथी महंत डॉ. भक्तीचरणदासजी महाराज, डॉ.शेफाली भुजबळ, पंचवटीचे पोलीस निरीक्षक सुनील पवार, सीए. राम डावरे, प्रा.डॉ. विठ्ठलसिंग ढाकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. स्वागत महावीर इंटरनॅशनलचे अध्यक्ष डॉ. अनिल नहार, मनू मानसी संस्थेच्या अध्यक्ष मेगा शिंपी व कार्याध्यक्षा मंजू जाखाडी यांच्या हस्ते प्रथम पाहुण्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी महावीर इंटरनॅशनल आणि मनु मानसी संस्थेच्यावतीने ७० जणांना विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींना गुलाब पुष्प, सन्मान चिन्ह, सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला सनफार्मा एनर्जी, द पवार गार्डन यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी संगीता बाफना, जवरीलाल घिया, दिलीप टाटीया, राजेंद्र बाफना, आनंद चोरडिया, संदीप चोरडिया, राजेंद्र डुंगरवाल, मंजू जाखाडी, कविता बाविस्कर, विनया नागरे, मिरा आवारे, धनश्री गायधनी, लीना गिरमे, कविता गायके, जया बुरुंगे, रुपाली कोठूळे, शोभा सावंत, दिपिका पाटील, रुपाली वालझाडे, पूनम बर्वे,संध्या चोरडिया, यमुना लिंगायत, रिंकू पाटील यांनी अधिक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनु मानसी संस्थेच्या मेघा राजेश शिंपी यांनी केले. सूत्रसंचालन किरण मॅडम यांनी केले.आभार महावीर इंटरनॅशनलचे अध्यक्ष अनिल नहार यांनी मानले.





### बाळासाहेब सोनवणे यांना जीवनगौरव पुरस्कार

निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटना विभागीय अध्यक्ष तथा महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब दादा सोनवणे यांना शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक इ.कार्यातील योगदानाबद्दल जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

